## मं.स.कौ.हिं.का अर्ज क्र. २७/२०२३ मध्ये नि.०४ खालील आदेश

१. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२ नुसार मुळ अर्ज केलेला आहे. प्रस्तूत अर्ज सदर कायदयाचे कलम २३ नुसार तात्पुरता अंतरीम खावटी गैरअर्जदार क्र.०१ याच्या कडून मिळण्याकरीता केलेला आहे.

२. अर्जदाराच्या मते तिचे व गैरअर्जदार क्र.०१ चे लग्न दि. ०१.०४.२०२१ रोजी हिंदु जातीरितीरीवाजाप्रमाणे झाला. त्यानंतर ती गैरअर्जदार क्र.०१ च्या एकत्रित कुटुंबात नांदावयास गेली. सुरवातीचे काही दिवस गैरअर्जदारांनी तिला चांगली वागणूक दिली. काही दिवसानंतर तिचा मानसीक, भावनीक, शारिरीक, आर्थीक छळ करण्यास सुरवात केली. अर्जदाराचा होणा–या मानसीक, शारिरीक तसेच आर्थीक छळाबाबतचे सविस्तर वर्णन तसेच विवीध घटना अर्जदाराने आपल्या मुळ अर्जात नमुद केल्या आहेत.

३. अर्जदाराच्या मते तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून ती आर्थीकदृष्टया सर्वस्वी तिच्या आई–वडिलांवर अवलंबून आहे. त्यामुळे दरमहा १०,००० रुपये स्वत: साठी व ५००० रुपये अर्जदार क्र. २ साठी खावटी मिळण्यास ती पात्र आहे.

४. प्रस्तूत अर्जास गैरअर्जदार क्र.०१ ने नि.क्र. ११ नुसार मुळ अर्जास तसेच प्रस्तूत अर्जास आपला लेखी जबाब नोंदवला. गैरअर्जदार क्र.०१ च्या मते अर्जदार ही त्याची पत्नी असून लग्नानंतर २ ते ३ महिने ती शुल्लक कारणांवरुन गैरअर्जदारांसोबत वाद करत असे व गैरअर्जदार क्र.०१ याच्या एकत्र कुटुंबापासून वेगळे राहण्याचा तगादा लावत असे. गैरअर्जदार क्र.०१ याने देखील आपल्या जबाबात अर्जदाराच्या वर्तनुकीचे कथन करणारे अनेक प्रसंग नमुद केले आहेत.

५. गैरअर्जदार क्र.१ च्या मते अर्जदार ही स्वतः माहेरी निघून गेली. सोबत जातांना तिने आपले सोन्याचे दागदागिणे, कपडे लत्ते, तसेच कागदपत्रे आपल्या सोबत नेलेले आहे. गैरअर्जदार क्र.०१ याच्याकडे त्याच्या उदरनिर्वाहासाठी केवळ मजुरी करणे हेच साधन आहे. रोज मजुरी करुन त्याला १०,०००/– रुपये प्रतिमहिना मिळतो. त्यामुळे प्रस्तूत अर्ज नामंजूर करण्याची विनंती गैरअर्जदार क्र.०१ याने केली आहे.

६. अर्जदार व गैरअर्जदार याच्या कथनाचा विचार करता खालील मुद्दे विचारार्थ आले त्यावर खालील कारणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते काय? | होय |
| २. | अर्जदार ही गैरअर्जदारा कडून अंतरीम खावटी मिळविण्यास पात्र आहे काय? | होय |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजूर |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ व ०२ करिताः—**

७. दोन्ही मुद्दे सलग्न असल्याने चर्चेसाठी एकत्र काढले जात आहेत. कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम २३ अन्वये केलेल्या अर्जाचा विचार करणे हा खटल्याचा प्राथमिक टप्पा आहे त्यामुळे न्यायालयाने मुळ अर्जाची गुणवत्ता किंवा मुळ अर्जात अभिलेखावर आणल्या जाणा—या पुराव्याच्या खोलात जाणे अपेक्षीत नाही. या टप्प्यावर पिडीत व्यक्तीने संबंधीत आरोपाचे पुरावे आणणे अपेक्षीत नाही. हिच गोष्ट गैरअर्जदारांना देखील लागू पडते की, त्यांच्यावरील कोणतेही आरोप सिध्द करणे किंवा फेटाळणे अपेक्षीत नाही. आपली बाजू विश्वासहार्य वाटावी यासाठी दोन्ही पक्षाने प्रतीज्ञापत्र दाखल केले आहेत. त्यामुळे विचार करण्यास केवळ एक पैलू शिल्लक आहे की, अर्जात प्रथम दर्शनी गैरअर्जदार हे अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करण्याची शक्यता आहे काय.

८. अर्जदाराने कथन केल्या प्रमाणे तिचे लग्न गैरअर्जदार क्र.०१ सोबत झाल्याचे व लग्नानंतर ती गैरअर्जदार क्र.०१ च्या एकत्र कुटुंबात नांदण्यास गेल्याचे गैरअर्जदार क्र.०१ ने मान्य केले आहे. त्यामुळे अर्जदार ही न्यायालयात दाद मागण्यास पात्र आहे. अर्जदाराने आपल्या अर्जात गैरअर्जदारांद्वारे तिला होत असलेल्या शारिरीक, मानसीक, भावनीक तसेच आर्थीक छळाबद्दल सविस्तर नमुद केले आहे त्यासंबंधीच्या विवीध घटना तिने तारीख निहाय नमुद केल्या आहेत. या सर्व घटनांचे वर्णन अर्जदाराने शपथपत्रावर दिले आहे. अर्जदाराचे या टप्प्यावर अर्जदाराने शपथपत्रात कथन केलेल्या घटनावरुन अर्जदारास कौंटुंबिक हिंसाचार सहन करावे लागले किंवा अर्जदारासोबत कौंटुंबिक हिंसाचार झाल्यास प्रथम दर्शनी दिसून येते.

९. कौटुंबिक हिंसाचाराचे अस्तीत्व प्रथम दर्शनी दिसून येत असल्याने अर्जदाराने मागणी केलेल्या अंतरीम खावटीवर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. अर्जदार ही गैरअर्जदारापासून वेगळी राहत आहे या बाबात कोणताही वाद नाही. परंतु तिला उपजीवीकेचे साधन आहे यावर गैरअर्जदाराने भर

दिला आहे. अर्जदाराच्या उत्पन्नाचे प्रथम दर्शनी स्तराचा विचार करता अर्जदाराने आपल्या मालमत्ता व दायीत्व दर्शवणारे प्रतीज्ञापत्र दाखल केले आहे त्यावरुन असे दिसून येते अर्जदार स्वतःची उपजीवीका भागवण्यास असमर्थ आहे.

१०. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.०१ याने देखील आपले मालमत्ता व दायीत्वाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले नाही.

११. गैरअर्जदार क्र.०१ तर्फे केलेला युक्तीवाद तसेच कागदपत्राचे अवलोकन केले असता जरी गैरअर्जदार क्र.०१ कडे उत्पन्नाचे पुरेसे साधन नाही असे दर्शवले जात असले तरी गैरअर्जदार क्र.०१ ची पत्नी असल्याचे त्याला मान्य आहे. हे प्रकरण प्रलंबीत असतांना सन्मानाने जीवन जगता यावे आणि मुळ अर्जाला आव्हान देता यावे यासाठी तिला निश्चीतच खावटी आवश्यक आहे त्यामुळे अर्जदाराला अंतरीम खावटीच्या स्वरुपात काही प्रमाणात अंतरीम आर्थीक दिलासा देणे योग्य आहे. अर्जदाराचे अन्न वस्त्र, मुलभूत औषधोपचार इत्यादी मुलभूत गरजा आणि गैरअर्जदार क्र. ०१ चे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता या अर्जाच्या तारखे पासुन म्हणजेच दिनांक ०५.०६.२०२३ पासून मुख्य अर्जाचा निवाडा होईपर्यंत अर्जदाराला दरमहा ३,०००/– व अर्जदार क्र. २ ला २०००/– रुपये दरमहा अंतरीम निर्वाह देणे योग्य व न्यायोचित आहे. शेवटी मी असा निष्कर्ष काढते की, अर्जदाराला प्रथम दर्शनी आरोपींकडून कौटुंबिक हिंसाचाराला समोरे जावे लागले व तिला व अर्जदार क्र. २ ला या अंतरीम अर्जाच्या तारखेपासून दर महा ३,०००/– रुपये अंतरीम खावटी मिळण्याचा अधिकार आहे. परीणामी मुद्दा क्र.०१ व ०२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.०३ साठी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्रमांक ०१ ने अर्जदारास व अर्जदार क्र. २ ला अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०५.०६.२०२३ पासून मुळ अर्जाच्या निकालापर्यंत दरमहा ३,०००/– + २,०००/– असे एकुण ५,०००/– रुपये अंतरीम देखभाल स्वरुपात अंतरीम खावटी दयावी.

३. गैरअर्जदार क्र.०१ ने अर्जदारास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अंतरीम पोटगीची रक्कम अदा करावी.

४. या आदेशाची प्रत अर्जदारास व गैरअर्जदारास विनामूल्य देण्यात यावी.

५. दोन्ही पक्षाने मुळ अर्जाची सुनावणी जलद गतीने करुन तो लवकरात लवकर निकाली काढावा.

SUPRIYA NILESH PUND Digitally signed by SUPRIYA NILESH PUND Date: 2024.03.21 12:19:35 +0530

दिनांकः–२०/०३/२०२४ (एस.एन.पुंड)

ठिकाणः कारंजा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कारंजा